# सायबर सुरक्षितता जागरूकतेसाठी शिक्षक, विद्यार्थी सन्मानित

## क्विक हील सीएसआरचा उपक्रम



**मुंबई :**
क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी समाधान प्रदाता कंपनीने आपल्या सीएआर उपक्रमाच्या माध्यमातून मुंबईमध्ये 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्स'चे आयोजन केले. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषत: समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीम. अनुपमा काटकर आणि चार सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले.वालिया कॉलेज अंधेरी, मुंबई येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था मध्ये अलामुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग ॲण्ड टेक्नोलॉजी, आसनगाव; केआयएचईएसचे महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, मुंबई; व्हीपीएमचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे आणि वालिया सी. एल. कॉलेज ऑफ कॉमर्स व एल. सी. वालिया कॉलेज ऑफ आर्ट्स, अंधेरी, मुंबई यांचा समावेश होता.

या सोहळ्याला स्वयंसेवी संस्थांमधील १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.कॉलेज, शिक्षक आणि विद्यार्थी यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले, ज्यासाठी विजेते त्यांच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमात सक्रिय सहभाग दर्शवून कृती, उपक्रम आणि प्रसार प्रयत्नांचे वर्णन करणाऱ्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या डेटानुसार अंतिम करण्यात आले. क्विक हील फाऊंडेशन वेबसाइटवर एक समर्पित वोटिंग पेज तयार करण्यात आले,

जेथे नामांकित कामगिरी व्हिडिओ क्लिप म्हणून पोस्ट केली गेली. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा आणि क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटडेच्या ऑपरेशनल एक्सलन्सच्या प्रमुख श्रीम. अनुपमा काटकर म्हणाल्या, ''आमचा उद्देश - सेक्यूरिंग फ्युचर्स अनेक व्यक्ती आणि संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच शक्य झाले आहे. आज मी डीएससीआय, महाराष्ट्र सायबर सेल आणि स्थानिक पोलिसांसह आमच्या सर्व भागीदारांना 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमाला दिलेल्या अमूल्य पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानते. मुंबईमधील या पुरस्कारांसह आम्ही आमचे योद्धे - विद्यार्थी, कार्याचे नेतृत्व करणाऱ्या - कॉलेजेस आणि शिक्षक यांनी सर्व लोकांमध्ये सायबर सुरक्षेबद्दल जागरुकता पसरवण्यासाठी केलेल्या अभूतपूर्व कार्यासाठी त्यांचा सन्मान करतो.''